RNI No. MAHBIL/2012/48433
www.dgps.maharashtra.gov.in.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - ७, अंक - १५ ] गुरुवार ते बुधवार, एप्रिल १२ - १८, २०१८ / चैत्र २२ - २८, शके १९४० [ पृष्ठे ७६

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय / संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक २ एप्रिल, २०१८

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

***अधिसूचना***

क्रमांक टीपीएस-१८१७/२०२४/प्र. क्र. ११/१८/नवि-१३.—ज्याअर्थी, जुन्नर नगरपरिषदेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख 'उक्त विकास योजना' असा करण्यात आला आहे) शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ३७ वा) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम ३१ *(१)* अन्वये अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८११/६९७/प्र.क्र. १२७/११/नवि-१३, दिनांक ३ एप्रिल २०१२ अन्वये मंजूर केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेनुसार सि.स.नं. २५७३ मधील क्षेत्रावर आ. क्र. २५ प्राथमिक शाळा आरक्षण आहे (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, जुन्नर नगरपरिषदेने (यापुढे "उक्त नगरपरिषद" असे संबोधलेले आहे) ठराव क्रमांक १५०, दिनांक ३० नोव्हेंबर २०१५ अन्वये उक्त आरक्षण वगळूण त्याखालील क्षेत्र सार्वजनिक, निम सार्वजनिक विभागात समाविष्ट करण्याकरिता फेरबदलाची कार्यवाही करण्याचे ठरविले आहे (यापुढे "उक्त फेरबदल" म्हणून उल्लेखलेला) ;

आणि ज्याअर्थी, उक्त नगरपरिषदेने उक्त अधिनियमाच्या कलम ३७ *(१)* अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून उक्त विकास योजनेत उक्त फेरबदल प्रस्तावित करून शासनाकडे दिनांक १० जानेवारी २०१७ चे पत्र क्रमांक २४३९ अन्वये मंजुरीसाठी सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर, उक्त फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर करावा असे शासनाचे मत झाले आहे ;

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोट-कलम *(२)* अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करून शासन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदल प्रस्ताव नामंजूर करीत आहे.

सदरहू अधिसूचना नागरिकांच्या अवलोकनार्थ मुख्याधिकारी जुन्नर नगरपरिषद जुन्नर यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत एक महिन्याच्या कालावधीसाठी उपलब्ध असेल.

## महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांजकडून

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० (१) व ६० (२) अन्वये*

***सूचना***

क्रमांक डीपी/नरयो-११/प्र. क्र. ८४/शाखा-१/१२७/२०१८.— ज्याअर्थी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ३ *(क)*, दिनांक २६ मार्च २०१८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० *(१)* मधील तरतुदीनुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील क्षेत्रापैकी नकाशात दाखविलेल्या क्षेत्रासाठी, मांजरी खुर्द-कोलवडी नगर रचना योजना क्रमांक ११ तयार करण्याचा इरादा जाहीर केला आहे. त्यानुषंगाने सदरची नगर रचना योजना तयार करणेबाबतचा उद्देश उक्त अधिनियमाचे कलम ६० *(२)* अन्वये या जाहीर सूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे ;

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० *(३)* मधील तरतुदीनुसार उद्देशाची नक्कल तसेच मांजरी खुर्द-कोलवडी नगर रचना योजना क्रमांक ११ मध्ये अंतर्भूत असलेले क्षेत्र (गुलाबी रंगाच्या किनारीने) दर्शविणाऱ्या नकाशाची प्रत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयात, कार्यालयीन वेळेत, कामकाजाच्या दिवशी नागरिकांचे अवलोकनार्थ ठेवण्यात आली आहे. याची कृपया नागरिकांनी नोंद घ्यावी.

प्रस्तुत नगर रचना योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या क्षेत्राच्या चतु:सीमा वर नमूद नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत.

**किरण गित्ते,**

महानगर आयुक्त तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

पुणे, ४ एप्रिल २०१८.

---

## BY METROPOLITAN COMMISSIONER AND CHIEF EXECUTIVE OFFICER

*Declaration of Intention to prepare the Town Planning Scheme under-section 60 (1) and 60 (2) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

**Notice**

No. DP/TPS-11/C.R. 84/Br-1/127/2018.—The Pune Metropolitan Region Development Authority *vide* its Resolution No.3 (K) dated 26th March 2018 has resolved its intention to prepare the Manjari Khurd-Kolawadi Town Planning Scheme No.11, in accordance with the provisions of Section 60 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly *vide* this Public Notice hereby declares its intention to prepare the said Town Planning Scheme under-section 60 *(2)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

In accordance with the provisions of Section 60 *(3)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, a copy of the declaration along with the plan showing the area to be included in the Manjari Khurd-Kolawadi Town Planning Scheme No. 11, (shown in PINK verge) is kept open for inspection of the public in the office of the Pune Metropolitan Region Development Authority during office hours on all working days.

The area included in the Town Planning Scheme is bounded as shown in above mentioned plan.

**KIRAN GITTE,**

Metropolitan Commissioner and
Chief Executive Officer,
Pune Metropolitan Region
Development Authority, Pune.

Pune, 4th April 2018.

---